दाखल तारीख : १८/११/२०१९
नोंदणी तारीख : १८/११/२०१९
निकाल तारीख : २१/०२/२०२३
कालावधी : वर्ष महिना दिवस
०३ ०३ ०३

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २, नांदुरा, जि.बुलडाणा यांच्या न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी : एम.डी. दज्जुका)
(समरी पॉवर नसल्यामुळे सदरचे प्रकरण समन्स प्रमाणे चालविण्यात आले.)

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५१८/२०२२</u> <u>निशाणी क्र. २२</u>

**C.N.R. No. MHBU08-001368-2022**

महाराष्ट्र सरकारतर्फे
प्रभारी अधिकारी,
राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, बुलढाणा,
ता. बुलढाणा, जि. बुलढाणा. अभियोग पक्ष.

विरुध्द

पुरुषोत्तम पांडुरंग पांडव,
वय : ५५ वर्षे, धंदा : मजुरी,
रा. गांधी चौक, सब्जी मंडी, नांदुरा,
ता. नांदुरा, जि.बुलढाणा. <u>आरोपी.</u>

---

गुन्हा - महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ड) अन्वये

---

---

| | | |
|---|---|---|
| सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | - | श्री. बी.व्ही.वाहूरवाघ. |
| आरोपीकरीता विधीज्ञ | - | श्री. एन.एम. वेरुळकार. |

---

<u>न्यायनिर्णय</u>

(दिनांक २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी घोषित)

आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारु बंदी अधिनियमाच्या कलम ६५ (ड) अन्वये दोषारोप ठेवण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की, फिर्यादी दिनांक ०२/१०/२०१९ रोजी गांधी चौक, सब्जी मंडी, नांदुरा येथे दारूबंदी कार्यवाही कामी कार्यरत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन आरोपीच्या घरी दोन पंचासह छापा टाकला असता आरोपीच्या राहत्या घरात एका खाकी रंगाचे पृष्ठाचे ०७ बॉक्स मिळुन त्यामध्ये प्रत्येकी १०० नग प्रमाणे एकुण ७०० नग देशी दारु संत्राच्या ९० मिली क्षमतेच्या सिलबंद बाटल्या त्याची प्रत्येकी २६ रुपये दारु प्रमाणे अंदाजे एकुण अंदाजे किंमत १८,२००/- तसेच आरोपीच्या राहत्या घरातुन स्टील बकेटमध्ये देशी दारु संत्राच्या ९० मिली क्षमतेच्या २० नग सिलबंद बाटल्या मिळुन आल्या. त्यांची प्रत्येकी २६ रुपये प्रमाणे अंदाजे एकुण ६४० /- असा दोन्ही मिळुण एकुण १८,८४०/- विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला. सदरचा मुद्देमाल त्यांनी पंचासमक्ष जप्त करुन ९० मी.ली. ची एक शिशी रासायनीक विश्लेषणाकरीता वेगळी काढली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला येवुन आरोपी विरुध्द फिर्याद दिली. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन आरोपी विरुध्द अपराध क्र. २७७/२०१९ कलम ६५ (ड) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमानुसार नोंदविण्यात आला. तदनंतर तपास फिर्यादी एस.डी. चव्हाण, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक बुलढाणा, यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जवाब नोंदविले. तपासाअंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

३. मी आरोपीविरुध्द दोषारोप निशाणी क्र.१३ प्रमाणे ठेवला. आरोपीला दोषारोप मराठीमध्ये वाचुन दाखविला. त्याने गुन्हा कबुल नसल्याचे

सांगितले आणि संपरीक्षेची तयारी दर्शविली.

४. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा समोर आला असल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन निशाणी क्र. २० अन्वये नोंदविण्यात आले. खोटी केस केला असल्याचा बचाव आरोपीने घेतला.

५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बी.व्ही. वाहूरवाघ आणि आरोपीचे विधीज्ञ श्री. एन.एम. वेरुळकार यांचा युक्तीवाद ऐकला. वरील बाबींवरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन झाले. त्याचे निष्कर्ष मी त्याच्या समोर नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२/१०/२०१९ रोजी दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास, गांधी चौक, सब्जी मंडी, नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा येथे आरोपी हा त्याचे राहते घरात ९० एमएल च्या ७२० नग देशी दारु विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आले हे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले |

६. अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बी.व्ही.वाहूरवाघ व आरोपीतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. एन.एम. वेरुळकार यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमीमांसा

मुद्दा क्र. १ बाबत :-

७. या ठिकाणी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५ (ड) वाचणे योग्य राहील. कलम ६५ मादक द्रव्य किंवा भांग याची बेकायदेशीररित्या आयात करणे, इत्यादी बद्दल शास्ती...

> जो कोणी व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे तद्न्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा दिलेल्या कोणत्याही लायसन्सचे, पासचे, परवान्याचे किंवा प्राधिकार पत्राचे उल्लंघन करुन, -
>
> (ड) दारु बाटलीत भरील,
>
> (ई) कोणतेही मादकद्रव्य (अफु व्यतिरिक्त) किंवा भांग विक्री करेल किंवा विकत घेईल (किंवा जवळ बाळगील)
>
> त्यास, सिध्दापराध ठरविण्यात आल्यावर अशा प्रत्येक अपराधाबद्दल ३ वर्षापेक्षा कमी नसेल, परंतु ५ वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा २५,०००/- रुपयापेक्षा कमी नसेल, परंतु ५०,०००/- रुपयापर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

८. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी परमेश्वर एकनाथ चव्हाण (सा.क्र.२), पंच रामसिंह रमेशसिंह ठाकुर (सा.क्र १) व पंच विठ्ठल नारायण पाटील (सा.क्र ३) यांना (निशानी क्र. १४, १६ व १८ वर) तपासले. साक्षीदार क्र. २ यांनी असे कथन केले आहे की, दिनांक ०२/१०/२०२१ रोजी आरोपी हा त्याचे राहत्या घरात एका खाकी बॉक्स व स्टील बकेट मध्ये विनापरवाना देशी दारु अवैध्य रित्या विक्री करत असतांना मिळुन आला. त्यांनतर त्यानी दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. जप्त मुद्देमालापैकी ९० मि.लि. एक काचेची बॉटल रासायनिक विश्लेषणासाठी

वेगळे काढले. उर्वरीत मुद्देमाल ताब्यात सिलबंद केले. त्यानंतर आरोपीच्या विरुध्द फिर्याद (नि.क्र.१७) दिली. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरच्या घटनेच्या पुढील तपास दुय्यम निरीक्षक चव्हाण यांनी केला होता. त्यांनी पुराव्या दरम्यान आरोपीला न्यायालयात ओळखले. त्यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, आरोपीचे घर हे वर्दळीच्या ठिकाणी आहे व त्या रस्तयावर आजुबालुला फळ व भाजी विक्री करणारे बसतात. त्यांच्या नुसार छापा मारते वेळेस ते घटनास्थळी हजर होते व पंचा समक्ष आरोपीवर छापा टाकण्यात आला होता. परंतु, सदरहु प्रकरणात तपासण्यात आलेले घटनास्थळ व जप्ती पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही.

९. अभियोग पक्षाने प्रामुख्याने हे सिध्द केले पाहीजे की, आरोपीने या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले व त्याच्या ताब्यातुन मादक द्रव्य दारु जप्त केली. जप्त केलेले मादक द्रव्ये हे देशी दारुच आहे.

१०. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेले मादक द्रव्ये हे ७२० नग काचेच्या बॉटल दारु होती ही बाब सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावर रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला आहे. परंतु अभियोग पक्षाला हे सिध्द करणे आवश्यक आहे की, रासायनिक विश्लेषनासाठी काढलेला नमुना हा योग्य ताब्यामध्ये ठेवला होता, त्यावरील सिल (मोहरबंद) नमुन्याचे विश्लेषनासाठी प्रयोगशाळेमध्ये नेईपर्यंत अखंड होता, सदर सिल (मोहरबंद) नमुन्याचे विश्लेषनासाठी प्रयोगशाळेमध्ये काढला गेला व न्यायालयात सिध्द करणेसाठी जतन करुन ठेवला गेला. परंतु त्याबाबत अभियोग पक्षाचे साक्षीदार यांनी काही एक कथन केलेले नाही. त्यामुळे सदर बाब सिध्द होत नाही. तसेच आरोपीकडे परवाना होता की नाही याबाबत अभिलेखावर काहीही आलेले नाही. कथित जप्त माल हा मादक द्रव्य होता हे सिध्द होण्यासाठी रासयनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर सादर केला

आहे. सदर निशाणी क्र. २१ ला असलेल्या विश्लेषणाचा अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, रासनिय विश्लेषकाने नमुन्यात सॅम्पल मध्ये ४२.०५ टक्के इथील अलकहोल दाखविलेला आहे. तसेच, तपासलेला नमुना हा औषधी अगर प्रसाधन उपयोगासाठीचा नाही असे मत देखील मांडले आहे. मात्र या ठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, तपासलेला नमुना नक्की याच प्रकरणाशी निगडीत होता, हे दर्शविण्यासाठी आवश्यक नमुना वाहकाचा पुरावा नोंदविण्यात आलेला नाही. त्याच प्रमाणे नमुना घेतल्यापासून ब-याच कालावधीनंतर त्याचे विश्लेषण झाल्याचे सदर अहवालावरुन दिसुन येते. अशा परिस्थितीत नमुन्यातील द्रव्याचे मुळ गुणधर्म तशेच्या तसे राखण्यासाठी काही उपाययोजना केली होती किंवा नाही, याबाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. म्हणून रासयनिक विश्लेषण अहवालातील निष्कर्ष अचुक आहेत असे निश्चीतच म्हणता येणार नाही.

११. उपरोक्त चर्चेनंतर मी या निष्कर्षास पोहचत आहे की, अभियोग पक्ष आरोपीवरील गुन्हा संशयाच्या पलीकडे सिध्द करु शकला नाही. सबब मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारर्थी नोंदवीत आहे.

१२. आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. मुद्दा क्र. २ चे उत्तराच्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी पुरुषोत्तम पांडुरंग पांडव,रा. गांधी चौक, सब्जी मंडी, नांदुरा, ता. नांदुरा, जि.बुलढाणा., यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) प्रमाणे मुंबई दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ड) च्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये रुपये १५०००/- चे वैयक्तीक बंधपत्र सादर करावे. सदर वैयक्तीक बंधपत्र

अपील कालावधी संपेपर्यंत अस्तित्वात राहिल.

४. मुद्देमाल (असल्यास) पोलीस अगर राज्य उत्पादन विभागाने रितसर नाश करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by MEGHA DEEPAK DAJJUKA
Date: 2023.02.23 16:37:04 +0530

नांदुरा (एम.डी. दज्जुका)
दिनांक – २१/०२/२०२३. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २,
नांदुरा, जि. बुलडाणा.

- - - - -

मी खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :- | यो.सु. मुळे |
| न्यायालयाचे नांव | :- | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २, यांचे न्यायालय नांदुरा. |
| पिठासिन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | :- | २१/०२/२०२३. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | २१/०२/२०२३. |